
सकाळ

निर्भयता हे नैतिकतेचे पहिले लक्षण आहे. भित्रा माणूस कधीही नीतिमान होऊ शकत नाही. -महात्मा गांधी

वर्ष १६ अंक ४५ १६ सप्टेंबर १९९५

# ताराराणी विद्यापीठ – महिला शिक्षणाचा अखंड स्त्रोत



ताराराणी विद्यापीठ

स्वप्न कोण पाहात नाही? पण ते स्वप्न सत्यात उतरण्यासाठी किती जण प्रयत्न करतात, हा खरे तर संशोधनाचा विषय होईल. (कै.) विश्वनाथ तुकाराम तथा व्ही. टी. पाटील मात्र स्वप्नं पाहून ती सत्यात उतरविण्यासाठी अखंड धडपडणारा कर्मयोगी ! एक स्त्री शिकली तर घर सुशिक्षित, सुसंस्कृत बनतं आणि पर्यायानं समाजही ! काकाजी म्हणूनच साऱ्यांना परिचित असणाऱ्या व्ही. टी. पाटील यांनी याच ध्येयानं स्त्री सुशिक्षित करण्याचं स्वप्न सुमारे ५० वर्षांपूर्वी बाळगलं आणि ते सत्यात उतरवलं. करवीर संस्थापिका, रणरागिनी छत्रपती ताराराणींच्या नावे स्त्री शिक्षणाचा अखंड वसा घेऊन अव्याहतपणे उंच उंच झेपावणारे काकाजींचे हे स्वप्न म्हणजेच ताराराणी विद्यापीठ !

साधारण १९३८ ची घटना. करवीरचे छत्रपती राजाराम महाराज एका हळव्या क्षणी काकाजींना म्हणाले, 'जिच्या पराक्रमाची आणि कष्टाची भाकर आज मी खात आहे, त्या ताराराणींचे, तिच्या पराक्रमाला अनुरूप स्मारक कोल्हापुरात व्हावे, ही माझी इच्छा आहे. या कामासाठी माझे निम्मे राज्य आंदणाने देण्यास मी तयार आहे.' राजाच्या अंतःकरणातील तळमळ काकाजींनी जाणली आणि तेथेच त्यांना 'ताराराणीचे चिरंतन स्मारक' उभारण्याचा शब्द दिला. त्यानंतर दोन वर्षांनी छत्रपती राजाराम महाराज गेले. मात्र राजेसाहेबांना दिलेला शब्द साकारण्यासाठी काकाजींनी धडपड चालूच ठेवली.

१९४५ मध्ये काकाजींनी प्रथम ताराराणी विद्यामंदिराची स्थापना केली आणि स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी पहिले पाऊल टाकले. कोल्हापुरातील राजारामपुरीत मणेर यांच्या एका दुमदार इमारतीत आताच्या भव्य विद्यापीठाचा अंकुर तेव्हा रुजला आणि दिसामाजी वाढत, विस्तारत गेला. केवळ २२ विद्यार्थिनींच्या समावेशाने सुरू झालेला हा शिक्षण विकास आज पाच हजारांवर विद्यार्थिनींना ज्ञानामृत पाजतो आहे.

काकाजी म्हणजे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. पत्रकारिता, सहकार,

> **केवळ स्त्री शिक्षणाला वाहून घेतलेले कोल्हापुरातील ताराराणी विद्यापीठ आज (शनिवारी) सुवर्णमहोत्सव साजरा करत आहे. त्यानिमित्त या विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा.**

राजकारण, शिक्षण, समाजकारण अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. नगराध्यक्ष, इलाखा पंचायतीचे अध्यक्ष, आमदार, खासदार अशी राजकारणातील चढती कमान कायम राखतानाच केवळ शिक्षण आणि त्यातही महिला शिक्षणाला त्यांनी १९५० नंतर वाहून घेतले. अर्थात, पत्नी (कै.) सौ. सरोजिनीदेवी यांची त्यांना सर्व कार्यात साथ होतीच. १९४५ ला स्थापन केलेल्या शाळेचा विस्तार वाढत गेला आणि विद्यामंदिर व संलग्न संस्था यांचे विलिनीकरण करून काकाजींनी १९५३ मध्ये 'ताराराणी विद्यापीठा'ची स्थापना केली. बालभवन, प्राथमिक शाळा, उषाराजे हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, कीर्ती कॉलेज, कुमार भवन (कडगाव) आणि शिवराज कॉलेज (गडहिंग्लज) असा ताराराणी विद्यापीठाचा संसार फुलत, विस्तारत राहिला. १९८४ मध्ये केवळ महिलांसाठी कमला कॉलेजची स्थापना करून आणखी एक झेप घेतली. गृहशास्त्र (होम सायन्स) या व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाचे एम. ए. पर्यंतचे प्रशिक्षण देणारे हे या भागातील एकमेव महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात सोळाशेवर विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. अकरा लाख रुपये खर्चून सुसज्ज ग्रंथालय इमारतही बांधली आहे. परगावाहून येणाऱ्या मुलींसाठी वसतिगृहाची निकड फार मोठी होती. ही गरज लक्षात घेऊन १९५१ मध्ये संस्थेने मासिक दोनशे रुपयांच्या भाड्याच्या इमारतीमध्ये वसतिगृह सुरू केले. तेव्हा आणि आजही अत्यंत अल्प खर्चात ५० मुलींची वसतिगृहात राहण्या-जेवण्याची सोय केली जाते. वाढत्या विद्यार्थिनी संख्येमुळे १९६९ मध्ये संस्थेने १०० मुलींसाठी ३४ खोल्यांचे वसतिगृह बांधले. सौ. सरोजिनीदेवी पाटील महिला वसतिगृह असे त्याचे नाव असून सहजीवनाचे संस्कार आणि भारतीय संस्कृतीची जोपासना यांचा मिलाफ साधत वसतिगृह कार्यरत आहे. शिक्षणाबरोबरच अन्य क्षेत्रांतही मुलींचा सर्वांगीण विकास व्हावा, या ध्येयाने विद्यापीठाने शिवणकाम, चित्रकला, नृत्य, संगीत, क्रीडा आदी क्षेत्रांतही शिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. मुलींना सैनिकी शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, यासाठी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजकडे ज्युनिअर डिव्हिजन, तर कमला कॉलेजकडे सीनिअर डिव्हिजन राष्ट्रीय छात्रसेनेचे प्रशिक्षण दिले जात आहे.

या विद्यापीठासाठी कोल्हापूर दरबाराने सहा एकराची जागा तेव्हा मोफत दिली. संस्थेचा वाढता विस्तार लक्षात घेऊ महाराष्ट्र शासनाने प्रथम चार एकर आणि नंतर क्रीडांगणासा एक एकर २० गुंठे जागा दिली. अशा प्रकारे सुमारे १२ ए परिसरात ताराराणी विद्यापीठरुपी सुसज्ज शिक्षण संकुल बह आहे.

हे सारे करत असताना काकाजींना अनंत अडचणी आल पण शिवरायाच्या सुनेच्या म्हणजेच ताराराणींच्या नावाने चिरं स्मारक उभारण्यासाठी त्यांनी सर्वांवर मात केली. गेली ५० स्त्री-शिक्षणाचे बहुमोल कार्य करणाऱ्या या विद्यापीठा काकाजींनी, आजच्या बाजारभावाचा विचार केला, तर कि ५० लाखांची किंमत होईल, इतक्या संपत्तीची देणगी दिली. दत्तक वगैरे घेऊन वारसा चालविण्याचा संकुचित विचार पा दांपत्याने न करता विद्यापीठातील मुली याच आपल्या मानून कार्य केले. 'सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ विश्वस्त निधी देणगीतून स्थापन केला गेला.

काकाजींची सारीच स्वप्ने साकार झाली का ? तारा विद्यापीठाबरोबरच अनेक शिक्षण संस्था कोल्हापूर शैक्षणिक विकासाला हातभार लावत आहेत. पण विद्यापीठाने हेतुपुरस्सर कुणाशी स्पर्धा टाळली आणि आ आगळे स्थान स्त्री-शिक्षणात टिकविले. राज्यातील म विद्यापीठाची स्थापना कोल्हापुरात व्हावी- आणि तारा विद्यापीठामार्फत ते चालविले जावे, अशी काकाजींची इ होती. हे कार्य खूप मोठे आहे. गगनाला गवसणी घालण्यासा आहे. पण काकाजींचे स्वप्न साकारण्यासाठी संस्था प्रयत्नश आहे. हो. अर्थात कुणी कर्ण, तर कुणी हरिश्चंद्र बनले तर स हे स्वप्न साकारू शकेल.